पान १ वरुन...

### लोकमतच्या विजय दर्डाला १०० कोटींची नोटीस

फ्रेम करूनच कारवाई करावी लागेल. थेट दोषी ठरविणे बेकायदेशीर आहे. अशी शिक्षा रद्द करण्यात यावी.

**Re: Pollard (1868) 2 P. C. 106, Ebrahim Parekh AIR (1926) Rangoon 188** प्रकरणात कायदा ठरवून दिला की कोर्ट अवमानना प्रकरणात आरोपीने आरोप मान्य जरी केले तरीही आरोप निश्चित करणे (Framing of Charge) हे न्यायालयावर बंधनकारक आहे. हा कायदा भारतात सर्व न्यायालयांना बंधनकारक राहील असे पूर्ण खंडपीठाने **'Sukhdev Singh 1954 SCR 454** प्रकरणात स्पष्ट केले आहे व या कायद्याचे उल्लंघन करून दिलेली कोर्ट अवमाननाची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने **'R.S. Sherawat (2018) 10 SCC 574** प्रकरणात रद्द केली.

दि. 27.04.2020 चे आदेश हे कोणतेही चार्जेस फ्रेम न करता पारित केल्यामुळे बेकायदेशीर व रद्दबादल ठरतात.

५ सदस्यीय खंडपीठान **Ramesh Maharaj (1978) WLR 90** प्रकरणात वकीलास चार्जेस फ्रेम न करता दिलेली शिक्षा हे त्या व्यक्तीच्या संवैधानिक मुलभुत अधिकारांचे उल्लंघन असून न्यायाधीशांच्या या गैरकायदेशीर आदेशाबद्दल शासनाने पिडीत व्यक्तीस नुकसान भरपाई द्यावी कारण न्यायाधीश हा शासनाच्या कार्यपालिकेच्या एक भाग आहे व अशा प्रकरणात रिट पिटिशन दाखल करता येते असा कायदा ठरवून दिला.

**M. S. Ahlawat (2000) 1 SCC 278** प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या फुल बेंच ने रिट पिटिशनमध्ये दोन न्यायाधीशांचे गैरकायदेशीर शिक्षेचे आदेश रद्द ठरविले. तो कायदा संविधान पीठाने **Roopa Hoora Vs. Ashok Hoora (2001) 4 SCC 388** प्रकरणात योग्य ठरविला आहे. म्हणून दि. २७.०४.२०२० चे आदेश गैरकायदेशीर व रद्दबादल ठरले आहेत.

(९) दोन न्यायाधीशांनी आपल्या आदेशात असे खोटे नमूद केले की, बॉम्बे बार ने दि.

२५. ०३. २०१९ चे पाठविलेले पत्र हे चीफ जस्टीस ऑफ इंडियाने न्या. रोहिंटन नरीमन यांच्या खंडपीठाकडे हस्तांतरीत केले असू शकते.

वरील निष्कर्ष हे चुकीचे असुन त्याचा खोटेपणा हा या संबंधात सुप्रिम कोर्टाचे रजिस्ट्रार यांनी दिलेल्या लिखीत माहिती वरुन सिद्ध होतो. रजिस्ट्रार यांनी माहिती दिली आहे की, ते पत्र चीफ जस्टीस ऑफ इंडिया यांनी कधीच न्या. रोहिंटन नरीमन यांना हस्तांतरीत केलेले नाही. तसेच न्या. नरीमन यांनी सुद्धा आपल्या आदेशात ते पत्र त्यांना कुठून मिळाले याचा कोणताही उल्लेख केलेला नाही.

खोट्या मुद्यांवर जर सर्वोच्च न्यायालयाने कोणालाही कोर्ट अवमानना अंतर्गत दोषी ठरविले असेल तर ते आदेश रद्द ठरतात असे आदेश स्वत: मागे घेतले पाहिजेत **(Recalled)** असा कायदा सर्वोच्च न्यायालयाने **N.F.L. -Vs- Tunckey (2013) 9 SCC 600** प्रकरणात ठरवून दिला आहे व स्वत:चे आदेश रद्द केले आहेत म्हणून त्या कायद्यानुसार २७.०४.२०२० चे आदेश परत घेण्यात यावेत.

(१०) संविधान पीठाने **सुब्रमन्यम स्वामी (2014) 12 SCC 344** प्रकरणात स्पष्ट केले की कोणताही कागद, पत्र, दस्तावेज, पुरावे हे न्यायालयापुढे कोर्ट अवमाननामध्ये दाखल करतांना हे नियमानेच योग्य प्रक्रियानुसार रिकॉर्डवर आणले जावेत. गोपनीयरीत्या कोणताही दस्तावेज न्यायालयास रिकॉर्डवर घेता येणार नाही.

**Murat Lal 1917 SCC OnLine Pat 1** प्रकरणात स्पष्ट कायदा केला आहे की, जर न्यायाधीशाने त्याला मिळालेले पत्र, पुरावे हे त्याला कुठुन प्राप्त झाले याचा उल्लेख आपल्या आदेशात केला नसेल तर जोपर्यंत तो न्यायाधीश स्वत:ला साक्षीदार म्हणून तपासत नाही तोपर्यंत त्या पत्रावर, पुराव्यांवर आधारीत निष्कर्ष काढून न्यायालय कोणताही कायदेशीर आदेश पारीत करू शकत नाही. असे आदेश रद्दबादल ठरतात.

दोन न्याधीशांनीं जो **C. K. Daphtary (1971) 1 SCC 626** प्रकरणातील पॅरा ७९ चा आधार घेतला आहे. तो चुकीचा आहे कारण पॅरा ७९ हा न्यायाधीशांसी संबंधीत नसून याचिका कर्त्याच्या संबंधात आहे. यामुळे न्यायालयाचे निष्कर्ष बेकायदेशीर व रद्दबादल ठरतात.

(११) सदर प्रकरणात न्यायालयाने स्वत:च २ सप्टेंबर २०१९ रोजीच्या आदेशात नमूद केले कि, ॲड. मॅथ्यू नेदूमपरा व इतर उत्तरवादीमध्ये कोणतेही आपसी संगनमत दिसून येत नाही. त्यामुळे त्याला दोषमुक्त केले. नंतर ९ सप्टेंबर २०१९ च्या आदेशात असे नमूद केले की निलेश ओझा व रशीद खान यांचा काहीही संबंध नाही. परंतू २७.०४.२०२० च्या आदेशात कोणताही नवीन पुरावा नसतांना वरील दोन्ही आदेशांविरुद्ध जाऊन असे नमूद केले की वरील चारही लोकांचे संगनमत आहे. असे विरोधाभासी आदेश देण्याचा अधिकार कोणत्याही न्यायाधीशास नसून असे आदेश हे भारतीय राज्यघटनेचे कलम १४ चे उल्लंघन आहे. ज्यानुसार कायद्याची अंमलबजावणी सर्व आरोपीनां सारखी असेल असा कायदा आहे व ज्या आधारावर मॅथ्यू नेदूमपरा यांना दोषमुक्त केले त्याच आधारावर इतर तीन्ही उत्तरवादींना दोषमुक्त करावेच लागेल. असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालयानेच **Laloo Prasad Yadav (2017) 8 SCC 1** प्रकरणात ठरवून दिला आहे. परंतू २७.०४.२०२० चा आदेश हा वरील नियमांचा अवमान असल्यामुळे बेकायदेशीर व रद्दबादल ठरतात. या संदर्भात संविधानपीठाने **Prof. Ramesh Chandra MANU/UP/0708/2007** नुसार कायदा ठरवून दिला आहे.

(१२) सदर प्रकरणात न्या. दीपक गुप्ता यांनी उत्तरवादी ॲड. विजय कुर्ले यांच्या वकिलांना युक्तीवाद करु दिला नाही व धमकी दिली की ॲड. सिद्धार्थ लुथरा यांच्या गुन्ह्यांबाबत व गैरकायदेशीर कृत्यांबाबत एक शब्द जरी बोलला तरी, तुरुंगात टाकण्यात येईल. त्यामुळे त्यांचे वकील युक्तीवाद करु शकले नाहीत. अशीच धमकी दिल्यामुळे न्या. अरुण मिश्रा यांच्या विरुद्ध **सुप्रिम कोर्ट बार असोसिएशनने ठराव पास केला** व शेवटी न्या. अरुण मिश्रा यांनी माफी मागितली. इथे सुद्धा असाच प्रकार घडला असुन संपूर्ण प्रक्रीयाच रद्दबादल ठरली असून प्रकरणात पुन:सुनावणी घेण्यात यावी असा कायदा पूर्ण खंडपीठाने **R. Vishwanathan AIR 1963 SC 1** मध्ये ठरवून दिला आहे. ही बाब दि. १६ मार्च २०२० च्या लेखी युक्तीवादात लिहून सुद्धा आदेशात त्याबद्दल काहीही नमुद केलेले नाही त्यामुळे आदेश रद्द ठरतात.

(१३) दि. २ मार्च २०२० रोजी ॲड. सिद्धार्थ लुथरा यांनी एकूण ९३ पानी लेखी व तोंडी युक्तीवाद केला. परंतू ०२.०३.२०२० च्या आदेशात उत्तरवादींना तोंडी युक्तीवादाची परवानगी न देता केवळ १० पानी लेखी युक्तीवाद सादर करावा असे आदेश दिलेत. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की लेखी युक्तिवादासह तोंडी युक्तीवादाची संधी देणे आवश्यक आहे. तोंडी युक्तिवादास मनाई केल्यास संपूर्ण प्रक्रीया रद्दबादल ठरते व सर्व निष्कर्ष, आदेश रद्द ठरतात. **[Automotive Tyre (2011) 2 SCC 258]**

(१४) उत्तरवादी क्र. २ व १ यांचे त्यांचे साक्षीदार बोलावून पुरावे सादर करण्याचे अर्ज अजून प्रलंबित आहे. त्यावर आदेशात काहीही नमूद नाही. उत्तरवादीस त्याचा बचाव सिद्ध करण्यासाठी पुरावे देण्याची परवानगी दिल्याशिवाय कोणतेही निष्कर्ष काढता येणार नाही. संशय कितीही दाट असेल तरी कोर्ट अवमानानना प्रकरणात त्या आधारावर शिक्षा दिली जावू शकत नाही असा स्पष्ट कायदा पूर्ण खंडपीठाने **R.K. Ananad (2009) 8 SCC 106, Prof. Ramchandra Kapse (1996) 1 SCC 206, Rajeev Dawar (2018) 12 SCC 437** प्रकरणात ठरवून दिला आहे. त्या कायद्याच्या विरूद्ध जाऊन दोन न्यायाधीशांनी काढलेले निष्कर्ष हे बेकायदेशीर ठरत असुन ते परत घेण्यात यावेत.

(१५) न्यायालयाने उत्तरवादी क्र. १,२ व ३ यांनी त्यांच्या डिस्चार्ज अर्जात व दि. १६.०३.२०२० च्या लेखी युक्तिवादात दिलेले कित्येक महत्त्वपूर्ण मुद्दे न्यायालयाने विचारात घेतलेच नाहीत व त्याबाबत कोणतेही कारण आपल्या आदेशात नमूद केले नसल्यामुळे सदर आदेश रद्दबादल ठरतात असा स्पष्ट कायदा **अशोक अग्रवाल (2014) 3 SCC 602, राम फल (2009) 3 SCC 258** प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिला आहे.

(१५) ॲड. सिध्दार्थ लुथरा यांनी न्यायालयात दिलेल्या खोट्या पुराव्यासंबधी व त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यासाठी केलेल्या अर्जावर दिं २७.०४.२०२० च्या आदेशात कोणताही उल्लेख नसुन कोणतेही कारण न देता ॲड. सिध्दार्थ लुथरा यांना सोडण्यात आले. त्यामुळे कारण न देता पारित केलेले आदेश रद्दबादल ठरतात. आदेशामध्ये दिलेले प्रत्येक मुद्द्यांवर दिलेले कारण हे संयुक्तिक व बृद्धीमत्तापुर्ण **(Intellecpual)** असावेत, रबर स्टॅम्प कारणे देऊन महत्वाचे मुद्दे फेटाळता येणार नाही. असे आदेश खारीज समजण्यात यावेत असा कायदा सर्वोच्च न्यायालयानेच **भागभाई (2019) MANU/GJ/0398/2019** नुसार ठरवून दिला आहे.

करीता वरील २७.०४.२०२० चे बेकायदेशिर आदेश परत घेण्यात यावे.

वरील सर्व मुद्यांवर दि. ०६.०५.२०२० रोजी सुनावणी झाली तेव्हा न्यायालयाने वरील

सर्व मुद्यांवर दि. २७.०४.२०२० च्या आदेशांचे पुर्नविलोकन (Review) होवू शकते असे नमूद करून उत्तरवादीचे वरील सर्व मुद्यांवरील अधिकार अबाधित ठेवले. परंतू दै. लोकमतने गुरूवार दि. ०७ मे २०२० च्या बातमीत असे लिहले की उत्तरवादीचे सर्व अर्ज फेटाळले आहेत. तसेच त्या बातमीत Review petition बाबत न्यायालयीन आदेशाचा कोणताही उल्लेख नसून विजय दर्डा व दै. लोकमतने पूर्वग्रह दूषित होऊन बेकायदेशीर बातमी प्रकाशित करून उत्तरवादींना आर्थिक, मानसिक व शारिरीक त्रास दिल्यामुळे दै. लोकमत विरुद्ध भादंवि 192, 469, 500, 501, 471, 474 r/w 120(B) &34 अंतर्गत कारवाई व कोर्ट अवमाननाची कारवाई करण्यात येणार आहे. अशा आशयाची नोटीस त्यांना पाठवण्यात आली आहे.

महत्वपूर्ण बाब म्हणजे प्रकरणातील एक न्यायधीश दिपक गुप्ता यांनी स्वत: दि. ८ मे २०२० रोजी स्क्रोल इनचे पत्रकार यांना दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले की, सदर प्रकरणातील त्यांच्या दि. २७.०४.२०२० आणि ०४.०५.२०२० च्या आदेशाचे पुर्नविलोकन (Review) होऊ शकते. त्यामुळे ते त्यावर काहीही भाष्य करू इच्छित नाहीत. न्या. दिपक गुप्ता यांच्या मुलाखतीमुळे विजय दर्डा व दै. लोकमत तोंडघशी पडले असुन त्यांचा खंडणीवसुलीचा धंदा लवकरच बंद होणार असल्याची माहिती रशिद खान पठाण यांनी दिली. दै. लोकमत ने एकतर्फी व खोटी बातमी सुडबुद्धीने प्रकाशित केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

उत्तरवादी ॲड. निलेश ओझा व रशीद खान पठाण यांच्या तर्फे देण्यात आलेल्या नोटीस मध्ये दै. लोकमतचे मुख्य संपादक विजय दर्डा व इतर यांनी ७ दिवसाच्या आत प्रत्येकी १०० कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी अन्यथा पुढील कारवाई करण्यात येईल असे नमूद केले आहे.

# निधर्मी म्हणवणाऱ्या भारतात धर्माधारित समांतर हलाल अर्थव्यवस्था कशासाठी हवी?

**हलाल प्रमाणित उत्पादनांवर बहिष्कार घाला - हिंदु जनजागृती समिती**

**प्रतिनिधी / १३ मे**

**वर्धा :** हलाल या अरबी शब्दाचा अर्थ इस्लामनुसार वैध! मूलत: मांसाच्या संदर्भातील हलालची मागणी आता शाकाहारी खाद्यपदार्थांसह सौंदर्य प्रसाधने, औषधे, रुग्णालये, गृहसंस्था, मॉल अशा अनेक गोष्टींत केली जाऊ लागली आहे. त्यासाठी खाजगी इस्लामी संस्थांकडून हलाल प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले गेले आहे. निधर्मी भारतात सरकारच्या अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण म्हणजे (एफएसएसएआय) कडून प्रमाणपत्र घेतल्यावर हे खाजगी इस्लामी प्रमाणपत्र घेण्याची सक्ती का? भारतात मुसलमानांची लोकसंख्या केवळ १५ टक्के असतांना उर्वरित ८५ टक्के हिंदूंवर हलाल प्रमाणपत्र का लादले जात आहे? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हलाल प्रमाणिकरणाद्वारे मिळणारे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न केंद्र शासन आणि राज्य शासन यांना न मिळता काही इस्लामी संघटनांना मिळत आहे. हे प्रमाणपत्र देणाऱ्या संघटनांपैकी काही संघटना आतंकवादी कारवायांमध्ये अडकलेल्या धर्मांधांना सोडवण्यासाठी न्यायालयीन साहाय्य करत आहेत. तसेच केंद्र सरकारने केलेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याला (सीएए) विरोध करत आहेत. निधर्मी भारतात अशी धर्माधारित समांतर अर्थव्यवस्था निर्माण केली जाणे, हे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय गंभीर असून शासनाने हलाल प्रमाणिकरण पद्धत तात्काळ बंद करावी आणि नागरिकांनी हलाल प्रमाणित उत्पादनांवर बहिष्कार घालावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीने केले आहे.

सर्वांत धक्कादायक म्हणजे स्वत:ला निधर्मी म्हणवणाऱ्या मागील सरकारने भारतीय रेल्वे, एअर इंडिया आणि पर्यटन महामंडळ यांसारख्या सरकारी आस्थापनांतही हलाल अनिवार्य करण्यास मोकळीक दिली, जी अजूनही चालू आहे. सुप्रसिद्ध हल्दीरामचे शुद्ध शाकाहारी नमकीनसुद्धा आता हलाल प्रमाणित झाले आहे. सुका मेवा, मिठाई, चॉकलेट, धान्य, तेल, यांपासून ते साबण, शॅम्पू, टूथपेस्ट, काजळ, लिपस्टिक आदी सौंदर्य प्रसाधने; मॅकडोनाल्डचा बर्गर आणि डॉमिनोजचा पिझ्झा हेही हलाल प्रमाणित आहे. इस्लामी देशांत निर्यात केल्या जाणाऱ्या उत्पादनांवर हलाल प्रमाणपत्र बंधनकारक आहे; पण हिंदुबहुल भारतात ही बंधने का? जर हे असेच चालू राहिले, तर ही भारताची इस्लामीकरणाकडे वाटचाल होत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारत सरकारचे अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण तसेच अनेक राज्यांत अन्न आणि औषध प्रशासन हा विभाग असतांना हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या अनेक इस्लामी संस्थांची आवश्यकताच काय आहे? प्रत्येक व्यापाऱ्याकडून या हलाल प्रमाणपत्रासाठी प्रथम २१,५०० रुपये आणि प्रतिवर्षी नूतनीकरणासाठी १५,००० रुपये घेतले जातात. यातून निर्माण झालेली ही समांतर अर्थव्यवस्था मोडून काढणे अत्यावश्यक आहे, अशी हिंदु जनजागृती समितीची भूमिका आहे. यासाठी भारतात हलालची अनावश्यकता, भारताच्या निधर्मीपणाला लावलेला सुरुंग, तसेच शासनाला होत असलेले नुकसान आदी विषयांवर समिती देशभरात उद्योजक बैठका, जागृतीपर व्याख्याने, तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून जागृती करत आहे.

# आयसोलेशन वॉर्डाला आमदार इंद्रनील नाईक यांनी दिली भेट



**ता.प्रतिनिधी / १३ मे**

**पुसद :** कोरोनाच्या रुग्णासाठी आरक्षित केलेल्या आसरपेंड येथील अनुसूचित जाती जमाती मुलींची निवासी आश्रम शाळेला आयसोलेशन वॉर्ड म्हणून आरक्षित केले आहे.

या आयसोलेशन वॉर्डला पुसद विधानसभा मतदारसंघाचे लोकनियुक्त लोकप्रिय लोकप्रतिनिधी कर्तव्यदक्ष युवा आमदार इंद्रनील नाईक यांनी दुपारी भेट दिली.

यावेळी सर्व शाळेची पाहणी केली. पाण्याची व्यवस्था, विद्युत पुरवठा, बेडची व्यवस्था, प्रत्येक वार्डात स्वतंत्र शौचालय या सर्व प्रकारच्या बाबींची पूर्तता येथे करण्यात आली आहे.

पुसद तालुक्यात अजूनपर्यंत कोरोनाचा एकही रुग्ण आढळून आला नाही. सरकारने पूर्वतयारी म्हणून ही व्यवस्था करून ठेवली आहे. तसेच पुसदला आयसोलेशन केलेल्या बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयातील वसती गृहाला पण भेट दिली.

यावेळी उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ आशिष पवार, अभिजित पवार, अयुक खतीब, पंकज राठोड आदी उपस्थित होते.

# परिचारिका दिनानिमित्त वाडी पत्रकार संघाकडून परिचारीकांचा सत्कार



**प्रतिनिधी / १३ मे**

**वाडी :** जागतिक परिचारिका दिनाचे महत्व लक्षात घेता वाडी पत्रकार संघाने आपले सामाजिक दायित्व पूर्ण करीत आज प्रातिनिधिक स्वरूपात वाडी परिसरातील विविध रुग्णालयात रुग्णांची सेवा करणाऱ्या ३ कोरोना योद्धा परीचारीकांचा शुभेच्छा व सत्कार घडवून आणला.

नक्षत्र रुग्णालयाच्या किर्ती सुंदरलाल नेवारे, आशा हॉस्पिटलच्या उर्मीला हेमराज जर व वेल्टट्रीट हॉस्पिटलच्या अंजली रामदास ढोले आदी परिचारिकांचा वाडी पत्रकार संघाचे अध्यक्ष गजानन तलमले, नक्षत्र हॉस्पीटलचे पॅथेलिस्ट सुंदरम ओझा, वेल ट्रिटहॉस्पीटलचे इंचार्ज अंश खानोरकर यांच्याहस्ते व वाडी पत्रकार संघाचे सचिव विजय वानखेडे, कोषाध्यक्ष दिलीप तराळेकर, सदस्य नरेशकुमार चव्हाण, विकास बनसोड, ऋषीकुमार वाघ यांच्या उपस्थितीत पुष्प व भेटवस्तू देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी सत्कारमूर्ती परिचारिकेने मनोगतात या सत्कारामुळे आम्हाला प्रेरणा मिळाली असून समाजाने व वाडी पत्रकार संघाने आमच्या कार्याची दखल घेतली या बद्दल मनोभावे आनंद झाला असल्याचे यावेळी सांगितले.

# युएईमधून मायदेशी येऊ इच्छिणाऱ्या भारतीयांना मसाला किंग धनंजय दातार यांचा मदतीचा हात

**पैसे संपल्याने अडचणीत आलेल्या गरजूंच्या विमानप्रवास व कोव्हिड चाचणीच्या खर्चाचा वाटा उचलणार**

**प्रतिनिधी / १३ मे**

**वर्धा :** कोव्हिड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन व हवाई वाहतूक बंद झाल्याने संयुक्त अरब अमिरातीत (युएई) अडकलेल्या हजारो भारतीयांच्या मदतीसाठी अल अदील समूहाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. दोन्ही देशांतील विमानसेवा नुकतीच पूर्ववत सुरू झाली आहे. विमानाच्या तिकीटाचे बुकिंग व मायदेशी परतू इच्छिणाऱ्या भारतीयांची कॉन्सुलेटकडे नाव नोंदणीही सुरू आहे. मात्र लॉकडाऊनला तोंड देताना अनेक भारतीयांकडील पैसे संपून गेले आहेत. अशा गरजूंच्या तिकीट खर्चाचा तसेच त्यांच्या कोविड चाचणीच्या शुल्काचा वाटा डॉ. दातार उचलणार आहेत.

या संदर्भात डॉ. दातार म्हणाले, परदेशांत अडकलेल्या भारतीयांना मायदेशी परत आणण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेला पुढाकार संपूर्ण जगभरात अशा स्वरुपाचा सर्वांत मोठा व व्यापक उपक्रम आहे. कोविड साथीमुळे जगभर आव्हानात्मक स्थिती निर्माण झाली आहे. आखाती देशांत शिक्षण, रोजगार व पर्यटनासाठी गेलेले अनेक भारतीय लॉकडाऊनमुळे तेथेच अडकून पडले आहेत. यात नोकऱ्या गमावलेल्या कामगारांचे प्रमाणही मोठे आहे. हवाई वाहतूक बंद झाल्यामुळे या लोकांपुढील अडचणी आणखी वाढल्या होत्या. या स्थितीत आपल्या देशबांधवांना सामाजिक बांधीलकीच्या हेतूने सर्वतोपरी मदतीचा निश्चय मी व माझ्या समूहाने केला आहे.

ते पुढे म्हणाले, हे सहाय्य करताना आम्ही संबंधित यंत्रणांची मंजुरी घेऊनच समन्वय साधत आहोत आणि त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचेही कठोर पालन करत आहोत. यासंदर्भात मी संयुक्त अरब अमिरातीतील भारताचे कॉन्सुलेट जनरल विपुल यांच्याशी चर्चा केली आहे. या भारतीयांना मायदेशी परतण्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांप्रती मी आभार व कृतज्ञता व्यक्त करतो.

डॉ. धनंजय दातार यांच्या चैतन्यशील नेतृत्वाखाली अल अदील ट्रेडिंगने ९ हजार भारतीय उत्पादने संयुक्त अरब अमिरातीत (युएई) आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून स्वत:च्या पिकॉक या ब्रँडअंतर्गत तयार पिठे, मसाले, लोणची, मुरंबे, नमकीन, इन्स्टंट अशा श्रेणींत ७०० हून अधिक उत्पादने ग्राहकांना उपलब्ध करुन दिली आहेत. अल अदील समूहाचे ४३ आऊटलेट्स, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त २ पिठाच्या गिरण्या व २ मसाला कारखाने असे जाळे दुबई, अबूधाबी, शारजा व अजमान येथे विस्तारले असून ओमान, बहारीन व सौदी अरेबियामध्ये नवी आऊटलेट्स उघडली आहेत. कंपनीने अमेरिका, कॅनडा, टांझानिया, केनिया, स्वित्झर्लंड, इटली व एरित्रिया तसेच कुवेत, ओमान व संयुक्त अरब अमिरातीत विशेष व्यापारी मार्ग स्थापन करुन आयात व निर्यात क्षेत्रातही विस्तार साधला आहे.

डॉ. दातार यांनी विविध संस्था व अनेक व्यक्तींना मदत करुन सामाजिक बांधीलकीही जपली आहे. भारतीय संस्कृतीचे आखाती देशांमध्ये संवर्धन करण्यात ते आघाडीवर आहेत. दुबईमध्ये मराठी उपक्रम राबवण्यास ते अधिकाधिक मदत करतात. त्यांना मुंबईत मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे सामाजिक उद्योजकता क्षेत्रातील योगदानाबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

पान ८ वरुन...

### शासनाच्या निगरगट्टपणामुळे सुधाकरने केली आत्महत्या

असल्याने सुधाकर आर्थिक विवंचनेत होता. असे मृतकाची पत्नी आशा हांडे यांनी रडत-रडत सांगितले.

आर्थिक टंचाईमुळे वैतागलेल्या सुधाकरला सततची नापिकी आणि प्रशासनाकडून मिळणारी सापत्न वागणूक यामुळे सुधाकरने शेवटी ५ में रोजी विष प्राशन केले. त्यांना अत्यंत दयनीय अवस्थेत घरच्या मंडळींनी उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल केले. शेवटी १० मेच्या रात्री सुधाकरने प्राण त्यागला. या प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे ऐन उमेदीच्या काळात घरधन्याने साथ सोडली. आजही चार लाखांचे कर्ज डोक्यावर आहे. मुलाचे लग्न करायचे आहे, आणि हातात केवळ एक हेक्टर शेतजमीन आहे. ड्रायपोर्टनी सुधाकरची शेतजमीन अधिग्रहित केली असती व घेतलेल्या जमिनीचे उचित दाम दिले असते, तर हांडे परिवारावर आभाळ कोसळले नसते, असे हांडे परिवाराचे म्हणणे आहे.

या संदर्भात श्रीमती आशा हांडे यांनी १२ मे रोजी मंगळवारला स्थानिक पोलीस ठाण्यात जिल्हा प्रशासन आणि रिलायन्स कंपनीच्या विरोधात लेखी तक्रार सादर केली आहे. पोलिसांनी त्याबाबत काय कारवाई केली आहे, हे वृत्त लिहेपर्यंत समजू शकले नाही. सुधाकरच्या अंतिम संस्कार समयी सेलूचे तहसीलदार महेंद्र सोनोने, ठाणेदार प्रशांत काळे आदी अधिकारी उपस्थित होते. लोकप्रतिनिधींनी याप्रकरणी यथोचित तडजोड करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

देखील होईल, महाराष्ट्रातील वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात

संपुर्णपणे दारुबंदीवर आळा घालायचा असल्यास शासनाला नविन उपाययोजना व नवीन पर्याय यांचा उपयोग केल्या शिवाय अंमलबजावणी शक्य नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने नविन यंत्रणा उभी करण्याकरिता योग्य कार्यवाही करावी अशी मागणी खा. रामदास तडस यांनी शासनाकडे केली.

### कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दर्पण पुरस्कार वितरण समारंभ स्थगित

पुरस्कारांचे वितरण असा संयुक्त कार्यक्रम दिनांक १७ मे २०२० रोजी दर्पण कारांच्या जन्मगावी, पोंभुर्ले, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील दर्पण सभागृहात पोंभुर्ले ग्रामपंचायत, जांभे - देऊळवाडी ग्रामस्थ व जांभेकर कुटुंबिय यांच्यासहकार्याने आयोजित केला होता. तथापि, सध्याच्या अत्यंत भयानक अशा कोरोना या जीवघेण्या साथीमुळे सदर कार्यक्रम स्थगित करण्यात आला आहे,अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये दिली आहे. दरम्यान, दिनांक १७ मे रोजी बाळशास्त्री जांभेकरांना पुण्यतिथीनिमित्त राज्यातील संपादक, पत्रकारांनी आपल्या घरात अथवा कार्यालयात प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करावे, असे आवाहनही रविंद्र बेडकिहाळ, संस्थेचे उपाध्यक्ष बापूसाहेब जाधव, कृष्णा शेवडीकर, कार्यकारी विश्वस्त विजय मांडके यांनी केले आहे.

कोरोनामुळे निर्माण झालेली आरोग्यविषयक परिस्थिती दूर झाल्यानंतर आणि महाराष्ट्र शासनाने कार्यक्रम घेण्याबाबत परवानगी दिल्यानंतरच दर्पण पुरस्कार वितरण समारंभ पूर्वसूचना देवून पोंभुर्ले, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील दर्पण सभागृहात आयोजित करण्यात येईल, असेही महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीच्यावतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

### २ हजार ८६४ परप्रांतीय नागरिकांची स्वगृही रवानगी

**१ हजार १६० लोकांना पाठविण्याचे नियोजन**

उर्वरित १ हजार १६० व्यक्तींना रेल्वेने पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उद्या दिनांक १४ मे ला जम्मु - काश्मीर चे ३७ विद्यार्थी आणि पंजाबच्या ४ व्यक्तींना नागपूरहून सुटर्णाय़ा रेल्वेने पाठविण्यात येणार आहे. याशिवाय बिहार- ३४३, उत्तरप्रदेश - ३११, पश्चिम बंगाल -८५, राजस्थान - १५३, आंध्र प्रदेश - ८९, तेलंगणा - ३३, केरळ - ४४, ओरिसा -२५, कर्नाटक - १३, दिल्ली -१३, गुजरात -८, हरियाणा - २

अशा १ हजार ११९ नागरिकांना रेल्वेने पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या नागरिकांना नागपूर पर्यंत बसने पोहचविण्यात येईल अशी माहिती नितीन पाटील यांनी दिली.